## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर-८२१/२०२२

**अपिलार्थी, श्री.दशरथ नाना थोरात**
**१००७, डायनॅमिक अल्टीमा ब्लीस,**
**मुथा कॉलेजच्या समोर, आधारवाडी जेल समोर**
**उंबर्डे, कल्याण(प), ठाणे ४२१ ३०१.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्य)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
अलिबाग बीच रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
अलिबाग बीच रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १३.५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १३.१२.२०२१ | ----- | १७.१.२०२२ | --- |

अपिलार्थी यांनी दि.११.३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती अधिकार नमुना अ व नमुना ब सुनावणी न घेतल्यागुळे व्यथित होऊन अपिल करीत आहे." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १३.५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन जन माहित अधिकारी श्री. प्रकाश कोकाटे, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. महारुद्र नाळे, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुनिता अमितकुमर चांदोरकर आणि तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी श्रीम. ज्योत्सना शिंदे-पवार, शिक्षणाधिकारी, माध्य. जिल्हा परिषद रायगड, अलिबाग या उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(आपल्या कार्यालयात सर्व त्रुटींची पुर्तता करुन कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव सादर केला होता. दि.२१.५.२०२१ रोजी त्यास ३ महिन्यापेक्षा अधिक काळ झाला आहे. तरी देखील आपल्या कार्यालयाने त्यावर काहीही निकाल दिलेला नाही. सदर प्रस्ताव निकाली काढला असल्यास त्याच्या छायांकित प्रती न्यायालयीन कामासाठी तात्काळ मिळाव्यात.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थींनी मागणी केल्याप्रमाणे माहिती त्यांना दि.१०.१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आली असून रजि.पोस्टाने पाठविल्याची नोंद त्यांनी आयोगास सादर केली आहे. यावर अपिलार्थी यांनी असा युक्तवाद केला की, त्यांना माहिती मिळालेली नाही. याबाबत रजि.पोस्टाची पोहोच सादर करण्यास सांगितली असता सदरची पोहोच जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही. सबब, तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिल्याचे दिसत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास विलंब झालेला आहे. या विलंबासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये **प्रत्येकी** प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु. २५,०००/-) इतकी शास्ती का लादण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीस आयोगाकडे सादर करणे उचित होईल. तसेच अपिलार्थींना सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने अथवा समक्ष विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्र. उपशिक्षणाधिकारी (माध्य.), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग (माध्य.) यांनी **अपिलार्थी यांना सदरची माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. **(१)** तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रकाश अनंत कोकाटे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), रायगड जिल्हा परिषद अलिबाग **तसेच (२)** विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुनिता अमितकुमार चांदोरकर, प्र.उपशिक्षणाधिकारी, (माध्य.), रायगड जिल्हा परिषद अलिबाग यादोघांनीही अपिलार्थी यांच्या दिनांक १३.१२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन, विहित मुदतीत माहिती पुरविली असल्याबाबतची कोणतीही पोहोच अथवा पुरावा आयोगास सादर केला नाही. म्हणून त्या **दोघांचेविरुध्द** माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये **प्रत्येकी** प्रति दिवस २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्या दोघांनीही ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२९.७.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ मे,२०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रकाश अनंत कोकाटे, उप शिक्षणाधिकारी (माध्य) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, अलिबाग बीच रोड, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

(२) विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुनिता अमितकुमार चांदोरकर, प्र.उपशिक्षणाधिकारी (माध्य) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, अलिबाग बीच रोड, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

**अपिल क्रमांक : के.आर-८२१/२०२२**
**अपिलार्थी, श्री.दशरथ नाना थोरात**
**सुनावणी दिनांक २२.८.२०२४ (In continuation of order dt. १३.५.२०२४)**

विवेचन

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुनिता अमितकुमार चांदोरकर, प्र. उपशिक्षणाधिकारी, (माध्य.), शिक्षण विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग ह्या उपस्थित आहेत.

या प्रकरणी उपस्थित अपिलार्थी यांनी असे निवेदन केले केले की त्यांना सदरची माहिती आयोगाच्या आदेशानंतर दि.२७.६.२०२४ रोजी प्राप्त झालेली आहे. आयोगाच्या दिनांक १३.५.२०२४ रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रकाश अनंत कोकाटे, उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक) रायगड जिल्हा परिषद अलिबाग तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती. सुनिता अमितकुमार चांदोरकर, प्रभारी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) रायगड जिल्हा परिषद अलिबाग या दोघांचा माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबतचा लेखी खुलासा आयोगाकडे सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते. त्यापैकी श्रीमती. सुनिता अमितकुमार चांदोरकर, प्रभारी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचा दिनांक २६.७.२०२४ रोजीचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त झाला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना आयोगाच्या आदेशानंतर दिनांक २७.६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये विनामूल्य माहिती पाठविण्यात आलेली आहे. मात्र, माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत त्यांनी कोणताही समर्थनीय लेखी खुलासा सादर केलेला नाही. सबब, त्यांना सुधारित लेखी खुलासा सादर करावयाचा आहे असे त्यांनी सुनावणी दरम्यान निवेदन केले. सबब, त्यांना सुधारीत लेखी खुलासा सादर करण्यासाठी वेळ देण्यात येत आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे तसेच या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री, प्रकाश अनंत कोकाटे, (सेवानिवृत्त) प्र. उप शिक्षणाधिकारी, (माध्य), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचाही लेखी खुलासा प्राप्त झालेला नाही. सबब, या दोन्हीही जन माहिती अधिकारी यांच्या लेखी खुलाशाकरिता प्रस्तुत प्रकरण पुढील तारखेसाठी सुनावणीसाठी ठेवण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च सुनावणी घेण्यात येईल.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली आहे.

२. प्रस्तुत प्रकरण (१) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रकाश अनंत कोकाटे, (सेवानिवृत्त) प्र. उप शिक्षणाधिकारी (माध्य), तसेच (२) विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुनिता अमितकुमार चांदोरकर, प्र. उपशिक्षणाधिकारी (माध्य), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्या लेखी खुलाशाकरीता सुनावणीसाठी ठेवण्यात येत आहे.

**३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१५.१०.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ ऑगस्ट, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रकाश अनंत कोकाटे, (सेवानिवृत्त) प्र, उप शिक्षणाधिकारी (माध्य) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, अलिबाग बीच रोड, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.
२. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुनिता अमितकुमार चांदोरकर, प्र.उपशिक्षणाधिकारी (माध्य) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग, अलिबाग बीच रोड, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

**अपिल क्रमांक : के.आर-८२१/२०२२**

**अपिलार्थी, श्री.दशरथ नाना थोरात**

**सुनावणी दिनांक १५.१०.२०२४ (In continuation of order dt. २२.८.२०२४)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुनिता अमितकुमार चांदोरकर,प्र. उपशिक्षणाधिकारी, (माध्य.), शिक्षण विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग या उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुनिता अमितकुमार चांदोरकर, प्र. उपशिक्षणाधिकारी, (माध्य.), शिक्षण विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी दि.११.१०.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, माहिती अर्ज ज्या कार्यासनाशी संबंधित आहे त्या कार्यासनाचे लिपिक श्री.अमोल ठाकूर, यांनी उपलब्ध करून दिलेल्या नस्तीमध्ये जा.क्र.राजिप/शिक्षण/माध्य/टीएनटी-१/११२/२०२२ दि.१०.१.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे सदरची माहिती अपिलार्थी यांना सदर पत्रावर नमूद केल्याप्रमाणे रजिस्टर पोस्टाने पाठविली असल्याचे सांगितले. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळाली असेल अशी त्यांची धारणा झाली. प्रत्यक्ष सुनावणीत अपिलार्थी यांना माहिती न मिळाल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याचप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रकाश अनंत कोकाटे, (सेवानिवृत्त) प्र. उप शिक्षणाधिकारी (माध्य), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनीही दि.१४.१०.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास वरीलप्रमाणेच लेखी खुलासा सादर केला आहे. सबब, या दोन्हीही जन माहिती अधिका-यांनी एकाच प्रकारचा लेखी खुलासा सादर केला असल्याने व त्यांचा खुलासा समाधानकारक असल्याने त्यांचा खुलासा मान्य करणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रकाश अनंत कोकाटे, (सेवानिवृत्त) प्र, उप शिक्षणाधिकारी (माध्य), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग **आणि** विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुनिता अमितकुमार चांदोरकर, प्र. उपशिक्षणाधिकारी, (माध्य.), शिक्षण विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक असून त्या दोघांचा दि.१४.१०.२०२४ रोजीचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यांना दि.२२.८.२०२४ च्या आदेशात दिलेली माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात येत आहे. प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२४

संगणक -10